**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१**
**जाहिरात क्रमांक १/२०१८**

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे/ कोकण/ नागपूर/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती विभागातील रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | ११/०४/२०१८ ते ०२/०५/२०१८ |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | १२/०५/२०१८ ते ०९/०६/२०१८ |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | ०९/०६/२०१८ |

**माहिती स्त्रोत**

| हेल्प लाईन क्रमांक | **माहितीकरिता संकेतस्थळ** |
|---|---|
| **1800-3000-7766** | **https://www.mahapariksha.gov.in** |

❖ **रिक्त पदांचा तपशील** : **संवर्ग - रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित)**
**वेतनश्रेणी** : **वेतनबँड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु. ४३००/-**

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | अनाथ मुले १ टक्का | |
| **१.** | २. | **३.** | **४.** | **५.** | **६.** | ७. |
| १. | अनुसूचित जाती | ४९ | १५ | ०२ | ०० | ३२ |
| २. | अनुसूचित जमाती | ३० | ०९ | ०२ | ०० | १९ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | १३ | ०४ | ०१ | ०० | ०८ |
| ४. | भटक्या जमाती (ब) | ०५ | ०१ | ०० | ०० | ०४ |
| ५. | भटक्या जमाती (क) | १२ | ०४ | ०१ | ०० | ०७ |
| ६. | भटक्या जमाती (ड) | ०७ | ०२ | ०० | ०० | ०५ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ८. | इतर मागास वर्ग | ७४ | २२ | ०४ | ०० | ४८ |
| ९. | खुला | १९७ | ५९ | १० | ०२ | १२६ |
| | **एकूण** | **३९३** | **११८** | **२०** | **०२** | **२५३** |

**टिप :** १) वरील राखीव/बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२) उपरोक्त ३९३ रिक्त पदांपैकी १४ पदे ही अपंगांच्या, एका पायाने अधू (OL-One Leg Affected) /श्रवणदोष (HH- Hearing Handicapped) या प्रवर्गासाठी आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

❖ **सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता -**

| अ.क्र | पद | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | रचना सहायक/ कनिष्ठ अभियंता (गट-ब) (अराजपत्रित) | स्थापत्य अभियांत्रिकी किंवा स्थापत्य आणि ग्रामीण अभियांत्रिकी किंवा नागरी व ग्रामीण अभियांत्रिकी किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान या मधील मान्यताप्राप्त संस्थेची, तीन वर्षाची पदविका किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक. |



Scanned by CamScanner

- उमेदवारांकडे उक्त पदासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त असणे आवश्यक आहे.

❖ **वयोमर्यादा :-**

१) उक्त पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील. तथापि खेळाडूंसाठी वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल.) तसेच अपंग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

२) अगोदरच शासनाच्या सेवेत असणा-या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा दहा वर्षानी शिथील राहील.

❖ भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

❖ स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

(सं.बा.सावजी)
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे
तथा
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय,पुणे

(नो.र.शेंडे)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned by CamScanner